# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ / फाल्गुन २६, १९४४ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) बंदरे आणि खनिकर्म मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-------------------------------------------

### रायगड जिल्ह्यातील आदिवासी वाड्या मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१) * १६९३४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव (ता.पेण, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीसह इतर वाड्यांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून महिलांना खड्ड्यांमधून पाणी भरावे लागत आहे तसेच या आदिवासी वाडीतील आदिवासींना आजतागायत दळणवळणाच्या दृष्टीने रस्ते नाहीत तसेच पेण तालुक्यातील पाच आदिवासी वाड्यांचा विकास खुंटला असून येथील वाड्यांमधील आदिवासी समाज हा मूलभूत सुविधांपासून आजही भारताचा अमृत महोत्सव साजरा होत असताना देखील वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील २५ आदिवासी वाड्यांवर आजही रस्ता, पाणी याची समस्या असल्यामुळे तेथे राहणाऱ्या आदिवासी बांधवांना खाचखळग्यांचा रस्ता आणि पाण्यासाठी वणवण सोसावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन वेगवेगळ्या योजना राबवित असून समाजातील मुलांसाठी शिक्षण तसेच मूलभूत सुविधा देण्यासाठी अनेक योजना असून सदर योजना या आजही शासकीय दप्तरी दुर्लक्षित राहिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी वाड्या या गावापासून डोंगर तसेच जंगल भागात असल्यामुळे गावाच्या वेशीपर्यंत रस्ते झाले असले तरीही आदिवासी वाडीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांकडे आजही प्रशासनाने दुर्लक्ष केले असून अनेक रस्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निधी उपलब्ध होत असला तरी वनविभागाची परवानगी मिळत नाही त्यामुळे आजही उक्त जिल्ह्यातील २५ वाड्या रस्त्यांपासून वंचित राहिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांमधील रस्ता, पाणी अशा विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री यांना वेळोवेळी निवेदने सादर केली असून उंबरमाळ आदिवासी वाडीसह इतर आदिवासींच्या विकासाकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्रकल्प कार्यालय पेण अंतर्गत रायगड जिल्ह्यात १२ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून ४८९४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व १० अनुदानित आश्रशाळा कार्यरत असून तेथे ४२४६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच ५ नामांकित इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा असून १०८३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शासकीय आश्रमशाळा मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी डि.बी.टी द्वारे निधी बँक खात्यात जमा करण्यात येतो. तसेच निवासी विद्यार्थ्यांना मोफत भोजन व निवास व्यवस्था पुरविली जाते. तसेच ११ शासकीय वसतिगृह असून ११९२ विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्यांना भोजन व शैक्षणिक साहित्याकरीता निधी बँक खात्यामध्ये जमा करण्यात येतो. तसेच पेण प्रकल्प कार्यालयातंर्गत वैयक्तिक सामुहिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

उप वनसंरक्षक, वन विभाग, अलिबाग यांच्याकडे वन हक्क अधिनियमांतर्गत प्राप्त रस्ता मागणीचे प्रस्ताव त्रुटी पुर्ततेकरिता संबंधित यंत्रणेस परत करण्यात आलेले आहेत.

(५) बोरगांव ग्रामपंचायत हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीसह इतर वाड्यांमध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत रुपये १२६.१० लक्ष रकमेची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर असून सदर काम प्रगतीत आहे.

तसेच बोरगांव ग्रामपंचायत अंतर्गत काजूचीवाडी, वरची तांबडी व तांबडी आदिवासी वाडीतील रस्त्याच्या ३ कामांना रुपये २८.८२ लक्ष रकमेस प्रशासकीय मंजूरी आदेश प्रदान करण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यातील २५ आदिवासी वाड्या ह्या १५ ग्रामपंचायती अंतर्गत असून त्यापैकी ५ ग्रामपंयती अंतर्गत ७ आदिवासी वाड्यांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रातंर्गत माडा क्षेत्रात आहे. तसेच उर्वरीत १८ आदिवासी वाड्या ह्या आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आहेत. त्याअनुषंगाने माडा क्षेत्रातील वंचित आदिवासी वाड्यांची पाहणी करण्यात आली असून ज्या सुविधांची गरज आहे त्या सुविधा आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रमांतर्गत करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## गंधेश्वर (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) प्रकल्पाच्या उर्ध्व भागात कोल्हापूरी बंधारे बांधण्याबाबत

**(२) * १७१०६ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंधेश्वर (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) प्रकल्पाचे बांधकाम लघु पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले असून सदर प्रकल्पात येणारे पाणी हे बाधित क्षेत्रातील ७ खोऱ्यांमधून येत असून पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात असल्याने दोन-तीन पावसातच प्रकल्प पूर्ण भरुन सांडव्यातून पाणी वाहत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्ध्व भागातील ७ उगम खोऱ्यांवर कोल्हापूरी बंधारे बांधल्यास अतिरिक्त पाण्याची साठवण होऊन खुलताबाद तालुक्यातील झरी, इंदापूर, रेल, धामणगाव, बोडखा, लोणी, सावखेडा अशा ७ गावांतील विहिरींना मुबलक पाणी उपलब्ध होऊन सिंचन व पिण्याच्या पाण्याची अडचण दूर होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्ध्व भागातील ७ उगम खोऱ्यांवर कोल्हापूरी बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात प्राथमिक पाहणी केली असता गंधेश्वर प्रकल्पाच्या उर्ध्व भागातील पाणलोट क्षेत्रामध्ये को.प.बंधारे बांधण्याकरीता तांत्रिकदृष्टया योग्य स्थळ उपलब्ध नाही.
(३) सविस्तर सर्वेक्षण करुन तांत्रिकदृष्टया योग्य असणाऱ्या ठिकाणी साठवण बंधारे, द्वारयुक्त बंधारे मृद व जलसंधारण विभागामार्फत प्रस्तावित करुन मंजूरीसाठी सादर करण्याचे नियोजीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील डोंगरावरच्या गावांचा डोंगरी विकास योजनेत समावेश करण्याबाबत

**(३) * १६९४२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) येथील डोंगरावरच्या गावांचा डोंगरी विकास योजनेत समावेश होत नसल्याने उक्त तालुक्यातील डोंगरावरील गावे मूलभूत सोयी सुविधेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, आटपाडी तालुक्यातील हितवड, मानेवाडी, मेटकरवाडी, बनपुरी, कामथ, मिटकी, घाणंद, जांभुळणी, धावडवाडी, नेलकरंजी, वलवण, घरनिकी, पिंपरी बु. पडळकरवाडी, पारेकरवाडी, झरे, कुरुंदवाडी, विभूतवाडी, औटेवाडी, चिंचाळे, खरसुंडी, बाळेवाडी, काळेवाडी, तळेवाडी या गावांचा डोंगरी विकास योजनेत समावेश करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या पंधरवड्यात केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील डोंगरावरच्या गावांचा डोंगरी विकास योजनेत समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) डोंगरी तालुक्यांचा समावेश करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर (MRSAC) यांनी Digital Elevation Model (DEM) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार केलेल्या नकाशाच्या आधारे काही तालुक्यांचा "डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात" समावेश करण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उप समितीच्या शिफारशी प्राप्त करुन त्याआधारे या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## महानिर्मितीच्या कोल वॉशरीजमधील नाकारलेल्या कोळशाच्या विक्रीत गैरप्रकार झाल्याबाबत

**(४)** * **१७७४९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महानिर्मितीने औष्णिक विद्युत केंद्रासाठी लागणारा कोळसा स्वच्छ करण्याचे कंत्राट राज्य खनिकर्म महामंडळामार्फत खाजगी वॉशरीजला दिले असून, स्वच्छ कोळसा वापरूनही कराराप्रमाणे उष्मांकामध्ये वाढ झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळसा स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होत नसल्यास करारानुसार दंड आकारला जातो परंतु, अद्यापही महानिर्मितीने संबंधित खाजगी वॉशरीजवर कोणतीही कारवाई केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानिर्मितीने कोल वॉशरीजमधील नाकारलेल्या कोळशाच्या विक्रीत देखील गैरप्रकार केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू खाजगी वॉशरीजवर तसेच कोळशाच्या विक्रीत गैरप्रकार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

महानिर्मितीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) ची कोळसा खाणीतील कोळसा उचलून वॉशरीमध्ये वॉश केलेला कोळसा विविध औष्णिक वीज केंद्रांना पुरविण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केली आहे.

(२) हे खरे नाही.

कोळसा धुतल्यानंतर त्याच्या मापदंडामध्ये सुधारणा न झाल्यास कराराच्या आधीन राहून महानिर्मिती विविध दंडनीय कार्यवाही करीत असते, त्यानुसार काही ठिकाणी मापदंडाप्रमाणे अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचे आढळल्यामुळे वर्ष २०२२-२३ साठी रुपये २.५९ कोटी इतका दंड आकारण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

वॉशरीजच्या रिजेक्ट कोळसाचे दर प्राप्त करण्याकरीता खनिकर्म महामंडळाद्वारा देश पातळीवर खुल्या निविदेद्वारे कोळसा वॉश करणे व वॉशरीच्या रिजेक्ट कोळशाचे दर मागविण्यात आले.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या मागणीबाबत

**(५) * १७५४४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर केला असून शहरी भागाकरीता रुपये १०८००, रुपये ५४००, रुपये २२५० तर ग्रामीण भागाकरीता रुपये ५४००, रुपये २७००, रुपये २२५० एवढा मंजूर करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना समान वाहतूक भत्ता ठेवण्याची मागणी दिव्यांग बांधवांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना शहरी भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना शहरी भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार व केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. सातव्या वेतन आयोगात वित्त विभागाच्या दिनांक २०/०४/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना शहरी भागाकरीता रुपये १०८००, रुपये ५४००, रुपये २२५० तर इतर ठिकाणांसाठी रुपये ५४००, रुपये २७००, रुपये २२५० वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(२) महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना यांनी वाहतूक भत्त्या बाबतचा शासन निर्णय दिनांक २०/०४/२०२२ रोजी निर्गमित झाल्यानंतर दिनांक २७/०४/२०२२ रोजीच्या निवेदनाव्दारे मुंबई, नागपूर व पुणे नागरी समूहांप्रमाणे ग्रामीण भागातील दिव्यांगाना रुपये ५,४००/- वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्याची मागणी केली होती.

(३) ग्रामीण भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना शहरी भागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांप्रमाणे वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांना दिलेले निवेदन मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) केंद्र शासनाने सर्वसाधारण केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना, देशातील काही नागरी समूहांना उच्च दराने व उर्वरीत ठिकांणाना अन्य दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय केलेला आहे. तसेच केंद्र शासनाने, केंद्र शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांना, केंद्र शासकीय सर्वसाधारण कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय वाहतूक भत्त्याच्या दुप्पट दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय केलेला आहे. सदर भत्ता हा रुपये २२५०/- पेक्षा कमी असू नये, असेही तत्व केंद्र शासनाने विहित केलेले आहे. त्याप्रमाणे राज्य शासनातही त्याच तत्वाचा आधार घेवून, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवरील प्रकाशा बॅरेज धरणाच्या उपसा सिंचन प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६) * १७८३२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीवर बांधण्यात आलेल्या प्रकाशा बॅरेज धरणाचे सिंचनाचे उद्दीष्ट सुमारे ८५००-८८०० हेक्टर इतके असताना सद्यःपरिस्थितीत एकूण मंजूर ११ उपसा सिंचन प्रकल्पांचे काम अपूर्णावस्थेत असल्याने परिसरातील शेकडो शेतकऱ्यांना अद्यापही सिंचनाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणाचे काम सन २००८-२००९ मध्ये पूर्ण होऊनही केवळ उपसा सिंचन प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्यामुळे गेल्या १४ वर्षांपासून बहुतांश शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन ओलीताखाली आणण्यासाठी ठरविलेले उद्दीष्ट पूर्ण होण्यासाठी व शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा याकरीता अपूर्णावस्थेतील काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकाशा बॅरेजच्या एकूण ११ सहकारी उपसा सिंचन योजनांची विशेष दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

प्रकाशा बॅरेजच्या मंजूर प्रशासकीय मान्यतेतील ३ उपसा सिंचन योजना व इतर ८ सहकारी उपसा सिंचन योजना अशा ११ उपसा सिंचन योजना व सारंगखेडा बॅरेज वरील ११ उपसा सिंचन योजना अशा एकूण २२ सहकारी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करुन त्या संबंधित सहकारी संस्थांना हस्तांतरीत करणेसाठी दिनांक ०६/०६/२०१६ रोजी रुपये ४१.७८ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीत त्यांची साधारणत: ४०% कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरीत दुरुस्तीचे कामे पूर्ण करण्यासाठी या २२ उपसा सिंचन योजनांना दिनांक २१/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ११५.०३ कोटी रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर उपसा सिंचन योजनांची दुरुस्तीची कार्यवाही प्रगतीत आहे. या शिवाय सदर प्रकल्पावर आतापर्यंत ८९८ शेतकरी वर्गास दीर्घकालीन व हंगामी अशा पाणी परवानगी देण्यात आल्या आहेत. त्यानुसार परवानगीधारक शेतकरी एकूण १७१७.०३ हेक्टर क्षेत्रावर सिंचनाचा लाभ घेत आहेत.

(३) शासन, जलसंपदा विभागाने २२ उपसा सिंचन योजनांच्या कामांसाठी दिनांक २१/०१/२०२२ च्या शासन निर्णयान्वये रुपये ११५.०३ कोटी किंमतीस सुप्रमा दिलेली आहे व या अनुषंगाने २०२२-२३ मध्ये रुपये २०.०० कोटी निधीची तरतूद आहे. तसेच सन २०२३-२४ मध्ये आवश्यकतेनुसार निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये हार-फुलांचा व्यवसाय करणाऱ्या तरुणाच्या अपहरण प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(७) * १७२२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये हार फुलांचा व्यवसाय करणाऱ्या तरुणाचे अपहरण करून सात लाखाची खंडणीची मागणी करुन सांगलीमध्ये तरुणाला महिनाभर डांबून ठेवल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी अपहरण करणाऱ्या टोळीतील पाच जणांपैकी एकाला दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अपहरण प्रकरणातील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) फुलांची मोठी ऑर्डर असल्याचे खोटे सांगून फूलविक्रीचा धंदा करणाऱ्या व्यक्तीचे अपहरण करुन पांडवझरी, ता.जत, जि.सांगली येथे डांबून ठेवून सात लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी पो.स्टे. ना.म. जोशी मार्ग, मुंबई येथे भारतीय दंड संहिता कलम ३८४, ३८६, ३६३, ३६५, ३४३, ५०६ (२), ३२३, १२० (ब), ११४, ३४ अन्वये पाच आरोपींविरुध्द दिनांक ०८/१२/२०२२ रोजी गु.र.क्र. १०७९/२०२२ दाखल करण्यात आला आहे.

बळीत इसमाची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. नमूद गुन्ह्यामधील एक आरोपीस अटक करण्यात आली असून इतर ४ आरोपींचा शोध सुरु आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सी.सी. टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत

**(८) * १७२०२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमधील तुरुंगात आणि चौकशीच्या ठिकाणी होणारे अत्याचार टाळण्यासाठी ऑडिओ रेकॉर्डिंगसहीत सी.सी. टि.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पोलीस महासंचालक यांना आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षे उलटूनही राज्यातील १०८९ पोलीस ठाण्यांपैकी ५४७ (५०%) पोलीस ठाण्यामध्येच सी.सी. टि.व्ही निगराणी बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरीत ५४२ पोलीस ठाण्यांचे काम करण्याबाबत विलंब करणाऱ्या सेवा पुरवठादार व इतर यंत्रणेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ मध्ये आदेशित केल्यानुसार राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरु करण्यात आले होते. सदर यंत्रणेमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंगची तरतूद नाही. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या एस.एल.पी. क्र.३५४३/२०२० मध्ये दिनांक ०२/१२/२०२० रोजी आदेशित केल्यानुसार ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध करुन देण्याचे काम प्रकल्पाच्या पुढील टप्प्यात करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) सद्य:स्थितीत १०८९ पोलीस ठाण्यांपैकी १०८२ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. उर्वरित ७ पोलीस ठाण्यांच्या नूतनीकरण व स्थलांतरामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम प्रलंबित आहे.

(३) व (४) पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामात विलंब झाल्यामुळे प्रकल्पाच्या RFP व करारातील तरतुदीनुसार सेवा पुरवठादार यांचेवर दंडात्मक शुल्क आकारण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## तापी महाकाय जलपुनर्भरण प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) * १७६४१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी पाटबंधारे महामंडळ अंतर्गत मंजूर असलेल्या तापी महाकाय जलपुनर्भरण प्रकल्पाचा (तापी मेगा रिचार्ज स्कीम) नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम निधी अभावी झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र व मध्यप्रदेशासाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या कामास लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेगा रिचार्ज योजनेच्या सर्वेक्षण, अन्वेषण व प्रकल्प अहवाल तयार करणेच्या काम तसेच Geographical aerial survey with remote sensing करणेचे कामास शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ अन्वये रुपये २१.९३ किमंतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तथापि, LiDAR सर्वेक्षणाचे काम व अन्वेषणाचे काम व इतर अनुषंगीक बाबी अंतर्भुत करुन रुपये ३१.३० कोटी किंमतीचा व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्रस्ताव तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यास व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

मेगा रिचार्ज योजनेची अंदाजपत्रके सन २०२२-२३ दरसुचीनुसार सुधारीत करुन सविस्तर संकल्पन व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार संबंधित अभिकरण WAPCOS यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषण या कामासाठी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी संबंधित अभिकरण WAPCOS यांना रुपये २२.४२ कोटी (जानेवारी, २०२३ अखेर) इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

-----------------

## कच्ची देवस्थान (ता.आष्टी, जि.बीड) येथील जमीन घोटाळ्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(१०) * १७०५२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कच्ची देवस्थान (ता.आष्टी, जि.बीड) येथील जमीन घोटाळा प्रकरणात आधी फौजदारी गुन्हे दाखल करा व नंतर तपास करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिलेली तक्रारच यासाठी एफआयआर म्हणून ग्राह्य धरावी असे सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विठोबा देवस्थान मुर्शदपुर, विठोबा देवस्थान पांढरी, विठोबा देवस्थान खडकत, खंडोबा देवस्थान बेलगाव, श्री रामचंद्र देवस्थान आष्टी, श्री रामचंद्र देवस्थान चिखली, श्री रामचंद्र देवस्थान चिंचपूर व पिंपळेश्वर देवस्थान आष्टी या आठ देवस्थानांच्या जमिनींचा जमीन घोटाळ्यामध्ये समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित जमीन घोटाळ्यात काही राजकीय पुढाऱ्यांचा सहभाग असल्याने प्रशासन दबावाखाली काम करत असून त्यामुळे सदर प्रकरणाचा योग्य प्रकारे तपास होणार नसल्याची तक्रार केली असल्याने घोटाळ्याशी संबंधित असलेल्या सर्व संबंधितांवर आधी फौजदारी गुन्हे नोंदवून योग्य तपास करण्याबाबत शासन स्तरावर पोलिसांमार्फत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद देवस्थानांपैकी श्री विठोबा देवस्थान, मुर्शदपूर, श्री विठोबा देवस्थान खडकत, श्री खंडोबा देवस्थान बेलगाव, श्री रामचंद्र देवस्थान आष्टी, श्री रामचंद्र देवस्थान, चिंचपूर व श्री पिंपळेश्वर देवस्थान आष्टी या सात व श्री विठोबा देवस्थान, पांढरी आष्टी अशा आठ देवस्थानांच्या संदर्भाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस ठाणे, आष्टी, जिल्हा-बीड येथे दिनांक २९/११/२०२२ रोजी गु.र.नं.३८६/२०२२ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-१९८८ (सुधारणा २०१८) चे कलम १३ (१)(अ)(ब), १३(२) तसेच भा.दं.वि. चे सह कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्याकडून सुरु आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान नमूद विषयाबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाले आहे. परंतु त्यामधील आरोपात तथ्य नसून दाखल गुन्ह्याच्या तपासामध्ये कोणत्याही प्रकारचा दबाब नाही. सदर गुन्ह्याचा तपास नि:पक्षपातीपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथे पोलीस भरतीसाठी आलेल्या दोघा तरुणांकडे उत्तेजक औषधी द्रव्ये सापडल्याबाबत

**(११) * १७३२१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथे पोलीस भरती प्रक्रियेच्या मैदानी चाचणीसाठी आलेल्या दोन उमेदवारांकडे उत्तेजक औषधी द्रव्य सापडली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) पोलीस भरती करीता आलेल्या काही उमेदवारांकडे औषधीद्रव्य असल्याची माहिती अलिबाग पोलीस ठाण्यास मिळाली होती. त्यानुषंगाने तपासणी केली असता रायगड पोलीस भरती करीता आलेले दोन उमेदवार व त्यांचा मार्गदर्शक यांच्याकडे मिळून आलेला मुद्देमाल व सदर तिन्ही व्यक्तींच्या रक्ताचे नमूने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून तपासणी अहवाल अप्राप्त आहे. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महामार्गांवरील अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१२) * १७८६५ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, नागपूर मुंबई समृध्दी महामार्ग तसेच इतर राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांमध्ये प्रचंड वाढ होऊन मनुष्यहानी तसेच मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षांत राज्यातील रस्ते अपघातात २७ हजारांहून अधिक जणांचे मृत्यू झाले असून प्रामुख्याने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, अन्य राष्ट्रीय महामार्ग, समृध्दी महामार्ग, मुंबई शहर, ठाणे व पालघर जिल्ह्यातील विविध मार्गांवर रस्ते अपघातांची संख्या लक्षणीय वाढली असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी त्याचप्रमाणे रस्ते अपघातांना परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने प्रामुख्याने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यभरात सन २०२१ मध्ये २९४७७ तर सन २०२२ मध्ये आतापर्यंत संकलित माहिती प्रमाणे ३३०६९ एवढे अपघात झाले आहेत.

(२) मागील २ वर्षात राज्यातील रस्ते अपघातात सन २०२१ मध्ये १३५२८ व सन २०२२ मध्ये १४८८३ असे एकूण २८४११ जणांचे मृत्यू झाले आहेत.

(३) राज्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:-

- अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता तसेच अपघातग्रस्तांना वैद्यकिय सेवा उपलब्ध करून देणे हे उद्देश समोर ठेऊन जनजागृतीकरीता जानेवारी महिन्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.
- संपूर्ण राज्यातून एकूण १००४ ब्लॅक स्पॉटची माहिती संकलित करून रस्ते अपघातांचे विश्लेषण करण्यात येऊन सदर ठिकाणी करावयाच्या तातडीच्या, अल्प व दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
- सर्व महामार्गांवर व रस्त्यांवर जड/ अवजड वाहनांना उजवीकडील मार्गिकेमधून मार्गक्रमण करण्यास मनाई करण्याबाबत तसेच सरळ रस्त्यांवरील व घाट मार्गातील वेगमर्यादा निश्चित करण्याबाबत अधिसूचना निर्गमित करून त्याबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.
- वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्याकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये “एक राज्य एक ई चलान” प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे.
- अपघात ग्रस्त व्यक्तींना हाताळण्याबाबत महामार्गावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना रस्ता सुरक्षा विषयक व प्रथमोपचाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- मुंबई शहरातील वाहतूक नियंत्रण शाखेतर्फे विविध शाळा व महाविद्यालयात वाहतूक नियमांबाबत चलचित्र व भाषणांद्वारे माहिती देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाकरीता विद्यार्थी आणि पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(१३) * १८२८७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देण्याच्या नावाखाली देणगी घेऊन अनेक विद्यार्थी आणि पालकांना चार भामट्यांनी कोट्यवधी रुपयांना फसविलेबाबतची तक्रार दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास जे.जे. मार्ग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरप्रकार जे.जे. रुग्णालय परिसरातील प्रशासकीय इमारतीत घडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने तपास केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले आहे आणि जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देण्याच्या नावाखाली विद्यार्थी आणि पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या इसमांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदरहू प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार सर जे. जे. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक २९/१२/२०२२ रोजी गु.र.क्र. ७५८/२०२२, भा.द.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह कलम ६६ क, ६६ ड, मा.तं. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.
(३) प्रस्तुत प्रकरणी मुंबई गुन्हे शाखेअंतर्गत विशेष पथक तयार करुन प्रस्तुत प्रकरणाचा तपास त्यांच्याकडे सोपविण्यात आला असून त्यांच्याकडील गु. प्र. शा. गु.र.क्र. ११/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४६७, १७०, १२० (ब), ३४ सह कलम ६६ क, ६६ ड, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील टेमघर धरणातून पाणी गळती होत असल्याबाबत

**(१४)** * **१७९६६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील टेमघर धरणावर ५०० कोटी रुपये खर्च करुनही धरणातून पाणी गळती होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टेमघर धरणातून होणारी पाणी गळती थांबविण्याकरिता जलसंपदा विभागाकडून धरणाच्या दुरुस्ती आणि मजबुतीसाठी २०० कोटी रुपयांची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धरणातील पाणी गळतीबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, धरणाच्या दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

टेमघर धरणाच्या गळती कामावर आतापर्यंत रुपये ९१.६६ कोटी इतका खर्च झाला आहे व टेमघर धरणाच्या एकूण कामाकरीता आतापर्यंत एकूण रुपये ४५६.५८ कोटी खर्च झाला आहे.

टेमघर धरणातून सन २०१० पासून गळती सुरु असल्याचे निदर्शनास आले. सन २०१६-१७ मध्ये गळतीचे प्रमाण २५८७ लीटर प्रति सेकंद एवढे होते. त्यानंतर माहे फेब्रुवारी, २०१७ पासून गळती प्रतिबंधक कामे हाती घेतल्यानंतर गळतीच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली. हे प्रमाण १९७ लीटर प्रति सेकंद एवढे आढळुन आले (९३ % घट). तथापि, सद्य:स्थितीत सुप्रमा अभावी सदर कामे जुलै, २०२० पासून संस्थगित करण्यात आली आहेत.

(२) होय, अंशत: खरे आहे.

टेमघर धरणातून होणारी गळती रोखण्यासाठी तज्ञ समिती (Panel of Expert) नेमली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली कामे सुरु करण्यात आली होती. सदर कामे १००% पूर्ण करण्यासाठी चालू निविदेतील रुपये ५२.९५ कोटी व अद्याप निविदा निश्चित न झालेल्या कामासाठी रुपये ४६.०८ कोटी अतिरीक्त निधी आवश्यक असल्याने याबाबतचा रुपये ७१०.९३ कोटी चा द्वितीय सुप्रमा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी धरणाची गळती रोखण्याकरीताच्या कामांवरील उर्वरीत खर्च रुपये ९९.०३ कोटी, धरण सुरक्षितता कामांकरीता रुपये ९५.५७ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित आहे.

(३) टेमघर धरणाची तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा यांनी दिनांक ०६/०८/२०१६ व दिनांक ३१/०८/२०१९ रोजी पाहणी केली असून त्यांना धरणामध्ये गळती होत असल्याचे निदर्शनास आले होते.

तसेच, टेमघर धरण गळती प्रतिबंधक कामे हाती घेतल्यानंतर मार्गदर्शनासाठी नेमलेल्या तज्ञ समितीच्या एकूण १० पाहणी दौरे व बैठका झाल्या असून गळती प्रतिबंधक कामांबाबत तज्ञ समितीने समाधान व्यक्त केले आहे.

(४) टेमघर धरणाची गळती रोखण्याकरीताच्या कामांवरील उर्वरीत रुपये ९९.०३ कोटी खर्चासाठी तसेच रुपये ९५.५७ कोटी खर्चाच्या धरण सुरक्षा कामासाठी मान्यता मिळणेस्तव सुप्रमा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

टेमघर प्रकल्पास द्वितीय सुप्रमा प्रदान केल्यानंतर सदर प्रकल्पाची उर्वरीत कामे तातडीने हाती घेण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या जमिनीवरील चाळींचा पुनर्वसन आराखडा तयार करण्याबाबत

**(१५) * १८२४० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील १३.८४ एकरांवर असलेल्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) जमिनीवरील नऊ गिरण्यांच्या ११ चाळींचा पुनर्विकास आराखडा तयार करण्याची विनंती एनटीसीने म्हाडाला केली असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीए व म्हाडाने या विषयीचा अभ्यास व सर्वेक्षण करुन पुनर्विकास आराखडा तयार करण्याचे काम किती दिवसात पूर्ण होईल,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) जमिनीवरील गिरण्यांच्या चाळीतील रहिवाशांसाठी पुनर्वसन आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या जागेवरील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून प्राप्त प्रस्तावाबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ यांच्या समन्वयाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येसगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील मुस्लीम स्मशानभूमीच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम करून पेव्हर ब्लॉक बसविण्याबाबत

**(१६)** * **१८३०० प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येसगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथे आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून बांधलेल्या मुस्लीम स्मशानभूमीच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम व पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम मे.डि.पी.मोरे अँण्ड कॉन्ट्रॅक्टर, कोपरगाव यांना सन २०१५-१६ अंतर्गत मंजूर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाबाबत ठेकेदार यांना काम न करतानाही देयक अदा करण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून याबाबत दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास पोलीस निरीक्षक, कोपरगाव यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) होय, सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक, कोपरगांव यांच्याकडे तक्रार अर्ज देण्यात आलेला आहे.
(४) व (५) सदर कामाची दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

-----------------

## कर्जत-नेरळ येथील आदिवासी मुलींच्या नविन शासकीय वसतिगृहात गरम पाण्याची उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * १८३४७ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत-नेरळ येथे नव्याने उभारण्यात आलेल्या आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात थंडीच्या दिवसात मुलींना गरम पाण्याची सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नेरळ, ग्रामपंचायतीच्या कार्यालयाला लागून महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाचे आदिवासी मुलींसाठी वसतिगृह असून तेथे ४७ विद्यार्थिनींं राहतात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत संबंधिताना तेथील मुलींनी तक्रार करूनही गरम पाण्यासाठी बसविलेले सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा देखील गेल्या दीड वर्षापासून कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विद्यार्थिनींसाठी सौर उर्जेवर चालणारी यंत्रणा गेल्या दीड वर्षापासून बंद असलेली कार्यान्वित करण्याबाबत कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, नेरळ या ठिकाणी मुलींना गरम पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण चार विद्युत गिझर दिनांक १७/०१/२०२३ रोजी बसविण्यात आलेले असून गरम पाण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(२) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड या वसतिगृहाची मंजूर क्षमता ७५ असून सध्या एकूण ५१ विद्यार्थीनी प्रवेशित आहेत.
(३) व (४) सौर ऊर्जेवर चालणारी यंत्रणा अद्यापपर्यंत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे यांच्या कार्यालयाकडून कार्यान्वित करण्यात आली नसून त्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, पेण यांच्या कार्यालयामार्फत पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी, लोअर परळ व गिरगाव येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंची भाडेवाढ कमी करण्याबाबत

**(१८) * १८३८५ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या वरळी, लोअर परळ व गिरगावातील प्रत्येक रहिवाशांना घरभाडे पोटी ७० ते ८० हजार रूपये भरण्याबाबत माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे हजारो कुटुंबियांना नोटिस पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडा इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरूंना सन २०१८ पूर्वी दरमहा २५० रूपये भाडे असताना या भाड्यामध्ये शंभर टक्के भाडेवाढ करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहे, सदरहू शंभर टक्के भाडेवाड कोणत्या सालापासून लागू करण्यात आली आहे,

(३) असल्यास, ही भाडेवाढ भाडेकरू रहिवाशांना अन्यायकारक असल्याने ही भाडेवाढ मागे घ्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू भाडेवाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) गिरगाव, वरळी, लोअर परळ भागातील ४८३ गाळेधारकांना थकबाकी भरणेबाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(२) उपकरप्राप्त इमारतीच्या डागडूजीवर होणारा खर्च, मालमत्ता कर, जल आकार व सामायिक विद्युत देयक इ. साठी प्रति गाळा प्रतिमाह खर्च साधारणत: रुपये २०००/- इतका आहे. सदर खर्चासाठी मार्च २०१९ पर्यंत रुपये २५०/- प्रतिमाह इतके सेवाशुल्क आकारण्यात येत होते. एप्रिल, २०१९ पासून रुपये ५००/- प्रतिमाह इतके सेवाशुल्क करुन यामध्ये प्रतिवर्ष १०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यानुसार सद्य:स्थितीत रुपये ६६५.५० प्रतिमाह प्रति गाळा इतके सेवाशुल्क आकारण्यात येत आहे. सदर सेवा शुल्क प्रति गाळा प्रतिमाह होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कमी आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सुधारीत सेवा शुल्क दराच्या आकारणीबाबत अथवा नोटिस बजावण्याबाबत तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांताक्रुज (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथे संरक्षण विभागाच्या अखत्यारितील जागेवर झोपडपट्टीधारकांचा पुनर्विकास प्रलंबित असलेबाबत

**(१९)** * **१८४१७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांताक्रुज (ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर) येथे संरक्षण विभागाच्या अखत्यारितील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांचा पुनर्विकास रखडलेला असून यासंदर्भात संरक्षण मंत्री, भारत सरकार व तत्कालीन मुख्यमंत्री यांच्यात सन २०१७ मध्ये बैठक झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास व ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुनर्विकासासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसताना तत्कालीन सरकारने सदर विषयासाठी त्रिसदस्यीय समिती गठित केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मा.संरक्षण मंत्री, भारत सरकार व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली दिनांक १८/०५/२०१८ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये सांताक्रुज गोळीबार येथील संरक्षण विभागाच्या मालकीच्या जमिनीवरील झोपड्यांच्या पुनर्विकासाचा मुद्दा चर्चेस आला.
(२) व (३) झोपडपट्टीने अतिक्रमित संरक्षण विभागाच्या जमिनीपैकी ५०% जागा अतिक्रमणमुक्त करुन संरक्षण विभागास देणे व ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबतचा मुद्दा बैठकीत चर्चिला गेला. तेथील झोपड्यांचे सर्वेक्षण करुन तसा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याचे उपरोक्त बैठकीत ठरले. त्यास अनुसरुन सांताक्रुज गोळीबार येथील न.भू.क्र.१२ व १५५ या वायुसेनेच्या मालकीच्या जमिनीवरील झोपड्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत ऑगस्ट ते नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच संरक्षण खात्याच्या मालकीच्या झोपडपट्टीव्याप्त जमिनीची राज्य शासनाच्या समान किंमतीच्या जमिनीसोबत अदलाबदल करण्याबाबतचा एक सूत्रबध्द कार्यक्रम निश्चित करण्यासाठी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी व संरक्षण विभागाचे अतिरिक्त सचिव यांची समिती गठीत करण्याचे निर्देश उपरोक्त बैठकीत देण्यात आले. त्यानुषंगाने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २१/०२/२०२२ रोजी बैठक पार पडली. संरक्षण विभागाच्या जमिनीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन संबंधित विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यास किंवा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत करणे शक्य असल्याने उक्त दोन्ही मुद्दयांचा विचार करुन उचित धोरण ठरविण्याबाबत केंद्र शासनास कळविण्याचे निर्देश मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिले. त्यानुसार दिनांक १५/०३/२०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये संरक्षण विभागास कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक २१/०२/२०२३ रोजीच्या अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अर्धशासकीय पत्रान्वये संरक्षण विभागास पुन:श्च स्मरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) परिसरात पत्रकाराची निर्घृण हत्या झाल्याबाबत

**(२०) * १८४७८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यामध्ये ग्रीन रिफायनरी प्रकल्प उभारण्याचे शासनाने प्रस्तावित केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सदर प्रकल्प नाणार अथवा बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे उभारण्याचे नियोजन असून सदर प्रकल्पाचे उभारणीस जनतेचा प्रखर विरोध असल्याने त्याबाबत नाणार रिफायनरी विरोधातील जनमत वृत्तपत्रांद्वारे मांडणाऱ्या पत्रकार शशिकांत वारिशे यांची नाणार परिसरात जाणीवपूर्वक वाहन अपघात घडवुन दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्घृण हत्या करण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा अपघात नसुन घातपात असल्याचा संशय, त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केला असल्याचे तसेच प्रेस क्लब ऑफ इंडियासह अन्य वृत्तपत्र संघटनांनी संयुक्त पत्रक जारी करुन त्याद्वारे हत्येमागे असलेल्या मास्टरमाईंडचा शोध लागण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती किंवा मा.सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती यांचेमार्फत हत्येची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी या प्रमुख मागणीसह अन्य मागण्या मांडून याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करावा, अशीही मागणी दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी मा.उपमुख्यमंत्री महोदय (मा.गृह मंत्री) यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पत्रकार शशिकांत वारिशे यांची नाणार परिसरात जाणीवपूर्वक वाहन अपघात घडवुन दिनांक ६ फेब्रूवारी, २०२३ रोजी निघृण हत्या करण्यात आल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रेस क्लब ऑफ इंडियाने दिनांक ०९/०२/२०२३ रोजी प्रसिध्दीपत्रक जारी केले आहे.

श्री.शशिकांत वारिशे हे महानगरी टाईम्स या वृत्तपत्राचे पत्रकार असून त्यांनी या वृत्तपत्रात आरोपीविरुध्द बातमी दिलेली होती. त्या गोष्टीचा राग मनात धरून उद्देशपूर्वक व जाणीवपूर्वक गाडीला ठोकून जीवे ठार मारले असल्याबाबत फिर्यादी यांनी पुरवणी जबाब दिल्यावरुन सदर गुन्ह्यात भा.दं.वि. कलम ३०२ समाविष्ट करण्यात आले आहे.
(४) पत्रकार श्री.शशिकांत वारीशे यांच्या हत्येचा कट हा पुर्वनियोजित आहे किंवा कसे याबाबतचा तपास करण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस उप अधीक्षक यांचे अधिपत्याखाली SIT ची स्थापना करण्यात आली असून पुढील तपास दिनांक ११/०२/२०२३ पासून सदरहू SIT मार्फत व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षणाखाली चालू आहे.

-----------------

## गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता शासकीय निवासस्थानाची बहुमजली इमारत बांधणेबाबत

**(२१) * १७०८४ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगापूर (जि. औरंगाबाद) शहरातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना राहण्यासाठी सन १९७८ ते ८० या कालावधीत शासकीय निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवासस्थानाचे बांधकाम ४० वर्षांपुर्वीचे असल्याने घरांची पूर्ण पडझड झाली असून सदर ठिकाणी कोणीही कर्मचारी राहत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गंगापूर शहरातील मोक्याच्या ठिकाणी लासुर नाका येथे पोलीस विभागाची स्वतःची दोन एकर जागा असून सदर ठिकाणी बहुमजली इमारत बांधण्याकरीता दोन वर्षापुर्वी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असूनही अद्याप यावर कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गंगापूर शहरातील पोलीस विभागाच्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर पोलिसांना राहण्यासाठी बहुमजली इमारत बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) गंगापूर जि.औरंगाबाद येथे इमारती बांधणेबाबत पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी दिनांक ३०/०९/२०२२ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.
(४) राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास प्राधान्यक्रम ठरवून दिनांक ०७/०२/२०२३ पत्रान्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये पोलीस स्टेशन गंगापूर येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता ४५ निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे.
त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांचेकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद विभागामध्ये विशिष्ट जमातीचे जात प्रमाणपत्र देताना गैरव्यवहार केल्याबाबत

**(२२) * १७८५५ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसुचित जमातीतील नागरिकांना जात प्रमाणपत्र देतांना शासनाने ठरविलेल्या निकषाच्या अनुषंगाने काही विशिष्ट जमातीच्या नागरिकांना जात प्रमाणपत्र देण्यात आले असतानाही त्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद विभागात अशी अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विभागात तात्पुरता पदभार असलेल्या एका अधिकाऱ्याने विशिष्ट जमातीचे जात प्रमाणपत्र देण्यासाठी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी अर्ज स्वीकारुन एकाच दिवसात जात प्रमाणपत्र दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशाप्रमाणे कागदपत्रांची शहानिशा व तपासणी न करता मनमानी पध्दतीने आर्थिक देवाण-घेवाणीतून जात प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याखालील नियम २००३ मधील तरतूदीनुसार करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याबाबत

**(२३) * १७२०३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ६४ कारागृहे असताना त्यात नऊ मध्यवर्ती, एक महिला, २८ जिल्हा, १९ खुल्या कारागृहांचा समावेश असून राष्ट्रीय गुन्हेगारी नोंद विभागाच्या सन २०२१ च्या अहवालानुसार कारागृहांची एकूण क्षमता २४ हजार ७७२ इतकी असताना एकूण ३६ हजार ८५३ कैदी बंदीस्त स्थितीत ठेवण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ३५,४६४ पुरुष आणि १३६८ महिला कैद्यांसह २१ तृतीय पंथीयांचा समावेश असून क्षमतेपेक्षा दुप्पट कैदयांना ठेवण्यात आले आहे, तसेच मुंबई, ठाणे, येरवडा आणि नागपूर या मध्यवर्ती कारागृहांत अनुक्रमे ३२५ टक्के, २८८ टक्के, १८० टक्के आणि ५६ टक्के कैदी अधिक आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी कैद्यांपेक्षा अंडरट्रायल कैद्यांची संख्या जास्त असल्यामुळे शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास,नारायणडोह (जि.अहमदनगर), पालघर, अलिबाग, हिंगोली, गोंदिया, भुसावळ, नांदेड, मुंबई येथे नवीन कारागृह स्थापन करण्यास प्राप्त झालेल्या जागेवर प्रस्तावित असलेले बांधकाम तात्काळ करण्याबाबत तसेच येरवडा व ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या जागेवर ३००० क्षमतेचे कारागृह बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, येरवडा व विसापूर खुले कारागृह, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, सातारा, अहमदनगर, सोलापूर या जिल्हा कारागृहांत आणि मुंबई, ठाणे, नागपूर या मध्यवर्ती कारागृहांत नवीन बॅरेक्सची बांधकामे करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राज्यात एकूण ६० कारागृहे आहेत. त्यात ०९ मध्यवर्ती, ३१ जिल्हा कारागृहे, १९ खुली कारागृहे व ०१ महिला खुले कारागृह यांचा समावेश आहे. सदर सर्व कारागृहांची एकूण अधिकृत बंदीक्षमता २४,७२२ इतकी असून, जानेवारी, २०२३ अखेर या कारागृहांत एकूण ४१, ०७५ इतके बंदी आहेत. यामध्ये ३९५०४ पुरुष बंदी, १५५६ महिला बंदी आणि १५ तृतीयपंथी बंद्यांचा समावेश आहे. राज्यातील कारागृहांत अधिकृत बंदीक्षमतेपेक्षा अधिक बंदी बंदिस्त असून, मुंबई, ठाणे, येरवडा आणि नागपूर या मध्यवर्ती कारागृहांत अधिकृत बंदीक्षमतेपेक्षा अधिक बंदी बंदीस्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) बंद्यांना मोफत कायदे व विधी सहायतेकरीता विविध स्वयंसेवी संस्था तसेच अझीम प्रेमजी ग्रुप (APPI) मार्फत कायदेविषयक सहाय्य पुरविण्यात येते. APPI यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार न्यायाधीन बंद्यांना मोफत कायदेविषयक मदत तसेच त्यांच्या जामीनासाठी रकमेची तरतूद करण्यात येते.

- सन २०१६ ते डिसें, २०२२ अखेर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अशासकीय संस्था, टाटा ट्रस्ट यांचेमार्फत एकूण १,२४,२८० एवढ्या बंद्यांना कायदेविषयक मोफत सल्ला देण्यात आला आहे.
- प्रत्येक कारागृहात मा.जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली बंदी पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली असून, सदर समिती न्यायाधीन बंद्यांचा आढावा घेऊन, ज्या बंद्यांची शिक्षा निम्मी भोगून झाली आहे अशा बंद्यांना जामीनावर मुक्त करण्याची कार्यवाही करते.
- कारागृहातील बंद्यांना व्ही.सी.द्वारे नियमितपणे मा.न्यायालयात उपस्थित करण्यात येत असल्यामुळे, त्यायोगे कारागृहातील अतिगर्दीची समस्या कमी होण्यास मदत होते. जानेवारी, २००५ ते डिसेंबर, २०२२ अखेर व्ही.सी.द्वारे हजर करण्यात आलेल्या बंद्यांची संख्या १०,६८,८९२ इतकी आहे.

(४) नारायणडोह (जि.अहमदनगर), पालघर येथे उपलब्ध जागेवर अनुक्रमे ५०० व १५०० बंदीक्षमतेचे नवीन कारागृह महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांच्याकडून बांधण्याचे प्रस्तावित असून, त्यासाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

- येरवडा व ठाणे मध्यवर्ती कारागृहांच्या अस्तित्वातील जागेवर ३००० बंदी क्षमतेचे नवीन कारागृह बांधण्यासाठी नकाशे, आराखडे तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. तसेच सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.
- हिंगोली, गोंदिया आणि भुसावळ या ठिकाणी कारागृह बांधण्यास जागा प्राप्त झाली असून, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांच्याकडून नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
- मौजे मंडाळे येथील Correctional Facilities या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या २.०२ हे.आर जागेवर नवीन कारागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(५) येरवडा महिला खुले कारागृह, येरवडा मध्यवर्ती कारागृह व येरवडा खुले कारागृह येथील बॅरेक्सचे बांधकामाकरीता सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

- चंद्रपूर, यवतमाळ, सातारा, सोलापूर, नागपूर येथील कारागृहांत बॅरेक्सचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
- मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे १२ A च्या जागेवरील अतिरिक्त सुरक्षा कक्ष, ठाणे (६० बंदीक्षमता असलेले काम) अंतिम टप्प्यात आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबई शहर आणि उपनगरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत भाडे थकविणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत

**(२४) * १७८६६ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील थकीत घरभाड्याची आजमितीस केवळ रूपये १२३ कोटी ४० लाख ५१ हजार ८६७ इतक्या थकीत घरभाड्याच्या रकमेचा भरणा खाजगी विकासकांकडून करण्यात आलेला असून, रुपये ६१९ कोटी ३७ लाख ३९ हजार एवढे घरभाडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपु प्रकल्पातील रहिवाशांना पुनर्वसन इमारतीतील घराचा ताबा देईपर्यंत घरभाडे द्यावे लागते वा संक्रमण शिबीरात हलवावे लागत असतानाही अनेक विकासक रहिवाशांचे घरभाडे थकवितात आणि प्रकल्पही रखडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घरभाडे थकविणाऱ्या तसेच प्रकल्प रखडविणाऱ्या विकासकांच्या विरोधात तसेच रहिवाशांना थकीत घरभाडे देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील एकूण १५० योजनांमध्ये अंदाजे एकूण ६४७.४८ कोटी इतके भाडे थकीत असल्याचे दिसून येते. त्यापैकी १२२.४० कोटी भाडे वसूल करण्यात आले असून ५२५.०८ कोटी भाडे प्रलंबित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

घरभाडे थकविणाऱ्या तसेच रखडविणाऱ्या विकासकांवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नोटीसा बजावण्यात आल्या असून विकासकांवर पुढीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

१. प्राधिकरण परिपत्रक १५३ मधील तरतुदीनुसार विकासकाचे विक्री घटकाच्या बांधकामास स्थगिती आदेश.

२. महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) चे अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अन्वये कारवाई.

३. विकासकास कोणतीही नवीन योजना करता येणार नाही.

४. विकासकास थकबाकीदार जाहीर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नागरिकाची बनावट स्वाक्षरीद्वारे आर्थिक फसवणूक करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्याबाबत

**(२५) * १७८९३ श्री.विलास पोतनीस, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विकासक श्री.मोहम्मद लोखंडवाला यांनी सामंजस्य करारावर साबिर रशिद यांच्या बनावट सह्या करुन फैजल रशिद यांचे संमतीशिवाय मिनर्व्हा प्रकल्प, महालक्ष्मी येथील त्यांच्या मालकीचे १८ कोटी रूपये किंमतीचे दोन फ्लॅट आयडीबीआय व एडलवाईज कंपनीकडे कर्जाच्या बदल्यात गहाण ठेवून फसवणूक केल्याबाबत पोलीस सहआयुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांच्या चौकशी अहवालात माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.साबिर रशिद यांनी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-३), मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस ठाणे यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२२ वा त्यादरम्यान तक्रार अर्ज दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही संबंधित विकासकाशी आर्थिक देवाणघेवाण करुन विकासकाविरुध्द वरळी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकांमार्फत गुन्हा दाखल करुन चौकशी करण्यात जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी विकासकावर व गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस ठाणे यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्यामार्फत केलेल्या प्राथमिक चौकशीवेळी तक्रारदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये सदरची बाब निदर्शनास आलेली आहे.
(२) होय.
(३) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदाराने दिनांक १४/१२/२०२२ रोजी वरळी पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार दिली होती. सदर तक्रार अर्ज चौकशीसाठी वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांचेमार्फत तक्रारदार यांना उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले होते. तसेच तक्रारदार यांचे वकील यांनी वरळी पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रारदार अर्ज चौकशीस येणार असल्याचा जबाब नोंदवूनही तक्रारदार अर्ज चौकशीसाठी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे पोलीसांमार्फत चौकशी करण्यास दिरंगाई करण्यात आली नाही.

तद्नंतर सदर अर्जातील आर्थिक फसवणूकीची तक्रार दहा कोटी रुपये पेक्षा जास्त असल्याकारणास्तव वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सदर तक्रार अर्ज पुढील चौकशीसाठी दिनांक २७/०२/२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग केला असून आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------

## सासोली (ता.दोंडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील महावितरणच्या सब स्टेशन व परिसराची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) * १८०२४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासोली (ता.दोंडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील मागील अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेल्या सब स्टेशन अधिकारी व कर्मचाऱ्याना राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या इमारतीची तसेच परिसराची अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सासोली येथील वीज महावितरणाच्या या सबस्टेशन मधून इन्सुली, कोनाळ कट्टा येथून वीज पुरवठा करण्यात येत असून कोटयवधी रूपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या सबस्टेशनकडे संबंधित महावितरण अधिकाऱ्याचे दुर्लक्ष झाल्याने तसेच अधिकारी व कर्मचारी यांना राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या इमारतीही वापराविना पडून असल्यामुळे ही निवासस्थानांची दुरवस्था झाली असून सदरहू सबस्टेशनच्या दुरावस्थेबाबत तेथील वीज ग्राहकांनी मागील सुमारे ३ वर्षांपासून कार्यकारी अभियंता, वीज महावितरण कंपनी, सावंतवाडी यांचेकडे लेखी तक्रारी करून याठिकाणी तातडीने सुधारणा करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त सबस्टेशनच्या दुरावस्थेस जबाबदार असणाऱ्या संबंधित महावितरणाचे कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सासोली सबस्टेशनची इमारत सुस्थितीत असून सासोली (ता.दोंडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये सद्या कोणीही राहत नाही. तथापि, सदर परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सासोली उपकेंद्र चालू स्थितीत आहे व इमारत सुस्थितीत आहे. सदर बाबत महावितरणच्या विभागीय तसेच उपविभागीय कार्यालयाकडे वीज ग्राहक, वीजकर्मचारी, वीज कर्मचारी संघटना यांची सबस्टेशन किंवा निवासस्थानाच्या इमारतीच्या दुरावस्थेबाबत लेखी तक्रारी/निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मोरा बंदर गाळमुक्त करण्याबाबत

**(२७) * १८३१५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८८९ ला दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरा ते मुंबई जलप्रवास विना अडथळा सुरू रहावा, यासाठी मोरा बंदरातील गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या खर्चानंतरही गाळाची समस्या कायम राहिली असल्याची बाब दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि मोरा बंदर गाळमुक्त करण्याबाबत तसेच रेवस येथे नवीन जेट्टी बांधण्याचे सुरु असलेले काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

मोरा (ता.उरण) येथे माहे मार्च-एप्रिल, २०१९ मध्ये ८८,२७५ घनमीटर इतका गाळ काढण्यासाठी रुपये २.१७ कोटी इतका खर्च आलेला होता. सन २०२२-२३ मध्ये १,१८,९२७ घनमीटर इतका गाळ काढण्यासाठी रुपये ४.०४ कोटी इतका खर्च आलेला होता.

गाळ साचणे हे नैसर्गिक प्रक्रिया असून समुद्राच्या भरती व आहोटी या चक्रामुळे जलमार्गात तसेच किनाऱ्याजवळ गाळ साचण्याची प्रक्रिया सुरू असते. न्यूनतम ओहोटीच्या वेळेस बोटी जेट्टीला लावण्यास अडथळा येतो. सद्य:स्थितीत मोराबंदर येथे प्रवासी वाहतूक व्यवस्थित सुरू आहे.
(२) गाळ साठणे ही प्रक्रिया नैसर्गिक असून मोरा बंदरामध्ये प्रवासी वाहतूक अखंडीत चालु ठेवण्यासाठी साठलेला गाळ वेळोवेळी काढून नौकानयन मार्गात आवश्यक खोली राखणे गरजेचे आहे.

मोरा (ता.उरण) बंदरामध्ये साचणाऱ्या गाळाच्या समस्येवर उचित उपाययोजना करण्यासाठी केद्र शासनाचे Central Water and Power Research Station (CWPRS) पुणे या संस्थेमार्फत सविस्तर अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल घेण्याचे प्रस्तावित आहे.

रेवस, (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे रो-रो जेट्टीचे बांधकाम करणेचे काम सागरमाला योजनेंतर्गत मंजूर आहे. सदर कामाचे कार्यादेश दिनांक ०८/०३/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेले असून कामाची मुदत २४ महिने म्हणजेच दिनांक ०७/०३/२०२१ पर्यंत होती. तथापि, दरम्यानच्या काळामध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यात लॉकाडाऊन जाहीर करण्यात आलेला होता. तसेच काही प्रमाणात ग्रामस्थांची देखील सदरच्या कामास विरोध होता. त्यामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. सद्य:स्थितीत काम, माहे ऑगस्ट, २०२३ अखेरपर्यंत सदरचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.